# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

**श्रीक्षेत्र पंढरपूर, जि.सोलापूर - ४१३३०४**

**(महाराष्ट्र शासन स्थापित)**




## जाहिर दरपत्रक - २०२५-२६

## विद्युत साहित्य पुरवठा करणेबाबत.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | पुरवठा कामाचा कालावधी | एक वर्ष |
| २ | अंदाजित खरेदी रक्कम | रू.४,००,०००/- |
| ३ | सुरक्षा अनामत रक्कम | रू.१२,०००/- |
| ४ | फॉर्म फी (विना परतावा) | रू.१०००/- |

**अधिक माहितीसाठी www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.**

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि.सोलापूर - ४१३३०४**
**क्र. विद्युत विभाग/का.वि./८१/२०२५**

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे विद्युत विभागासाठी विविध प्रकारचे विद्युत साहित्य पुरवठा कामाचे दरपत्रक दोन सिलबंद लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.**

१) सदर पुरवठा कामाच्या माहितीचे बुकलेट कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच मंदिर समितीच्या www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर मिळेल. **दरपत्रक फॉर्म स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात** व **त्यासोबतची सर्व कागदपत्रे स्वतंत्र सिलबंद लिफाप्यात** असे दोन सिलबंद लिफाफे दि.३०/०५/२०२५ सायंकाळी ५.०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक विद्युत साहित्य पुरवठा कामासाठी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष श्री.संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

**२) सदरबाबत अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक :- ०२१८६-२२४४६६, २२३५५०**

३) वरील पुरवठा कालावधीत सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास, बदल होवू शकतो व त्याचे अधिकार, कार्यकारी अधिकारी, मंदिर समिती यांनी राखून ठेवलेले आहेत.

**४) दरपत्रके उघडतेवेळी पहिल्यांदा कागदपत्रांचा (तांत्रिक) लिफाफा क्रमांक ०१ उघडण्यात येईल. जे पुरवठाधारक तांत्रिक लिफाफ्यामध्ये पात्र ठरतील, त्या पुरवठाधारकांचाच दर लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

५) पुरवठाधारकांनी तांत्रिक लिफाप्यामध्ये दिलेल्या दस्तऐवजाच्या मूळ प्रती मंदिर समितीने मागणी केल्यास सादर करणे बंधनकारक राहील.

६) कोणतेही दरपत्रक अगर सर्वच दरपत्रके कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिरे समितीने राखून ठेवलेले आहेत.

७) पुरवठाधारकांच्या कोणत्याही शर्ती व अटी मंदिर समितीवर बंधनकारक असणार नाहीत.

८) मंजुर पुरवठाधारकास मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत करणे बंधनकारक आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

९) मालाचा पुरवठा मागणीप्रमाणे न आलेस अथवा योग्य प्रतीचा/गुणवत्तेचा नसल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास मंदिर समितीची अडचण होऊ नये म्हणून व्दितीय, तृतीय न्युनतम पुरवठाधारकांकडून अगर इतर पुरवठाधारकांकडून बाजार भावाने आवश्यकतेनुसार मालाची खरेदी करण्यात येऊन त्यासाठी जादा लागलेल्या फरकाची रक्कम पुरवठाधारकाच्या बिलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसुल करणेत येईल.

१०) पुरवठा कालावधी कार्यारंभ आदेश दिल्यापासून एक वर्षाचा राहील. तथापि, पुरवठा कालावधीत सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास, बदल होवू शकतो व त्याचे अधिकार, कार्यकारी अधिकारी, मंदिर समिती यांनी राखून ठेवलेले आहेत.

११) मंजूर झालेल्या दराने व मागणी प्रमाणे मालाचा पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही व मागता येणार नाही. पुरवठाधारकाने मालाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास त्याची पुरवठा न केलेल्या मालाची सुरक्षा अनामत रक्कम समिती खाती जमा करणेत येईल.

१२) मंदिर समिती आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त ठेकेदाराला कार्यादेश देऊ शकते.

१३) मंदिर समितीस आवश्यकता वाटल्यास मंजुर पुरवठाधारकास १२ महिनेपर्यंत मुदतवाढ दिल्यास मंजुर दरात काम करण्याची जबाबदारी मंजुर पुरवठाधारकाची राहील. तथापि, पुरवठाधारकास हक्क सांगता येणार नाही.

१४) पुरवठा कालावधीमध्ये शासकीय कार्यालयाकडुन कर, उपकर, जकात यांचे दरामध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत समिती व्यवस्थापनाकडे मागणी करता येणार नाही.

१५) पुरवठाधारकाने मालाचा पुरवठा मध्येच बंद केल्यास व त्यामुळे सदर बाबतीत फेर प्रक्रिया करुन मालाची खरेदी करावी लागल्यास जाहिरात खर्च व प्रक्रियेचा इतर येणारा सर्व समावेशक खर्च मिळून येणारी रक्कम नुकसान भरपाई म्हणून पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

१६) पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती / नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रनाबाहेर असेल उदा. आग, महापूर, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व त्यामुळे पुरवठाधारकाचे नुकसान झाल्यास, त्यासाठी मंदिर समिती व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

१७) माल खराब असल्याचे आढळून आलेस जेवढा खराब असेल तेवढा बदलून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१८) माल चांगल्या गुणवत्तेचा असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भेसळ असता कामा नये.

१९) पुरवठादाराने मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या प्रमाणामध्ये चांगल्या प्रतिचा व गुणवत्तेचा माल पुरवठा करावयाचा आहे. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत, प्रमाण, गुणवत्ता संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

२०) दरपत्रकामध्ये मालाचा दर सर्व करासहीत नमुद करावा. माल पोहचविण्याचा वाहतुक खर्च, गंज लावणे, हमाली, पॅकींग अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

२१) सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २% आयकर व जीएसटी टिडीएस कपात केली जाईल. पुरवठा कामाची देयके मासिक/एकरकमी अदा करण्यात येतील.

२२) सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

२३) माल पुरवठा करणेचे ठिकाण श्री.संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप, पंढरपूर, जि.सोलापूर राहील.

२४) माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

२५) पुरवठाधारकास मालाचा पुरवठा मध्येच थांबवता येणार नाही. जर असे झाल्यास अनामत रक्कम जप्त करून त्याचे नाव काळया यादीत टाकले जाईल.

२६) पुरवठाधारकाने उच्च प्रतीचा /चांगल्या दर्जाचा व गुणवत्तेचा माल पुरवठा न केल्यास, पुरवठा कामाचे बिल अदा केले जाणार नाही. तसेच पुरवठाधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. दंडाची रक्कम ठरविण्याचे अधिकार मंदिर समितीस राहील.

२७) दरपत्रकात नमुद केलेल्या कामासाठी पुरवठाधारकाने दुस-या पुरवठाधारकास काम दिल्याचे आढळल्यास पुरवठाधारकाची मंजुर ई दरपत्रक रद्द करून, त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२८) पुरवठा कामाचे देयक सादर करताना देयकामध्ये आदेशातील वर्णनाप्रमाणेच संपूर्ण तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये. देयक छापील स्वरूपात असावे. त्यामध्ये बिल क्रमांक, दिनांक, मालाचे वर्णन, दर, जीएसटी, सही, शिक्का व इतर अनुषंगीक बाबींचा समावेश असावा.

२९) यासोबत दिलेल्या नमुन्यात दर नमुद करावेत. दर अंकी व अक्षरी स्पष्ट करणे आवश्यक आहे. दर नमुद करतांना खाडाखोड करू नये. अंकी व अक्षरी दरांमध्ये तफावत असल्यास कमी असलेला दर गृहीत धरण्यात येईल.

३०) सदर कामाच्या अटी व शर्तीबाबत कोणत्याही पुरवठाधारकास न्यायालयात दाद मागता येणार नाही.

३१) दरपत्रक ज्या फर्मच्या / व्यक्तीच्या नावाने असेल त्याच नावाने इतर सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भिन्नता आढळल्यास सदर दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही. सदर दरपत्रक अनाधिकृत समजून अपात्र ठविण्यात येईल. त्याबद्दल पुरवठाधारकास तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही.

३२) पुरवठाधारक मालाचा पुरवठा ठरलेल्या वेळेत करत नसेल, कामात चालढकल करत असेल, अथवा समाधानकारक काम करत नसेल तर समिती कोणतीही पुर्व सूचना न देता कॉन्ट्रॅक्ट रद्द करेल व पुरवठाधारकांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

३३) मंजूर पुरवठाधारकास सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा स्वतंत्र करारनामा मंदिर समिती बरोबर करणे बंधनकारक राहील.

३४) ज्यांचे दरपत्रक मान्य होईल, त्या पुरवठाधारकाने सुरक्षा अनामत रक्कम दरपत्रक मंजुर झाल्यानंतर तात्काळ मंदिर समितीकडे भरणा करणे आवश्यक आहे. सदर सुरक्षा अनामत म्हणुन एक वर्षासाठी किंवा मंजुर दरपत्रकास मुदतवाढ दिल्यास त्या मुदतीपर्यंत समितीकडे जमा केली पाहिजे. दरपत्रकात नमुद केलेल्या कामाबद्दल कोणतीही तक्रार नसेल तर कामाचा कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाईल. सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

३५) सदर दरपत्रकाची फॉर्म फी विना परतावा आहे, फॉर्म फी कोणत्याही परिस्थितीत पुरवठाधारकास परत मिळणार नाही.

३६) सुरक्षा अनामत रक्कम कंत्राटदाराचे काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर व करारनाम्याची मुदत संपल्यावर परत करण्यांत येईल.

३७) मंजुर पुरवठाधारक हा मंदिर समितीला माल समाधानकारकरित्या व मंदिराच्या मागणी प्रमाणे पुरवठा करण्यास सक्षम नसल्याचे आढळून आल्यास, कोणतेही कारण न देता पुरवठाधारकाशी केलेला करार रद्द करण्यांत येईल व त्याने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.

३८) कमी जास्त दराचे दरपत्रक स्वीकारण्याचा, नाकारण्याचा अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे मंदिर समितीवर बंधनकारक राहणार नाही.

३९) कार्यादेश प्रमाणे काम करत असलेल्या कामाचे केव्हाही परीक्षण, पर्यवेक्षण करण्याची मंदिरे समितीला पूर्ण अधिकार राहील.

४०) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर ७ दिवसांचे आत करारनामा करुन देण्यासाठी रु.५००/- चा गैरन्यायीक स्टॅम्पपेपर जमा करावा, परंतू अशाप्रकारे करारनामा करुन दिला नाही, अथवा त्याबद्दल टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करणेत येईल.

४१) सदरचे दरपत्रक कार्यादेश नसुन फक्त बीड ऑफ कोटेशन मागविण्यासाठी आहे.

४२) मंदिर समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

४३) सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

४४) प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

**४५) लिफाफा क्रमांक ०१ :- खालील सर्व कागदपत्रे सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक कागदपत्रांच्या पानावर पुरवठाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा. या आवश्यक कागदपत्रांमध्ये काही त्रुटी असल्यास किंवा कागदपत्रे कमी-जास्त किंवा सादर न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.**

| **अ.क्र.** | **आवश्यक कागदपत्रांची यादी.** |
|---|---|
| १ | फॉर्म फी (विना परतावा) मंदिर समितीच्या खात्यात RTGS/NEFT/ Internet Banking द्वारे किंवा रोखीने जमा केलेली पावती.<br>ICICI Pandharpur Branch Account No :- 647105005981 IFSC Code :- ICIC0006471 |
| २ | परिशिष्ट - १ प्रमाणे पुरवठाधारकाची माहिती. |
| ३ | शॉप ॲक्ट लायसन्स वा तत्सम परवाना. |
| ४ | जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र किंवा रू.२०,००,०००/- च्या आतमध्ये वार्षिक उलाढाल असल्यास, सनदी लेखापालचे प्रमाणपत्र. |
| ५ | पॅन कार्ड. |
| ६ | शासकीय /निमशासकीय /खाजगी संस्थाकडे पुरवठा केलेल्या कामाची अनुभव प्रमाणपत्रे. |
| ७ | परिशिष्ट - २ प्रमाणे प्रतिज्ञापत्र. |

**४६) लिफाफा क्रमांक ०२ :- खालील नमुन्यातील दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे. त्यावर पुरवठाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा. यामध्ये काही त्रुटी असल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.**

| **अ.क्र.** | **तपशिल** |
|---|---|
| ०१ | परिशिष्ट - ३. |

**परिशिष्ट क्रमांक - १**

## पुरवठाधारकांची माहिती

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | फर्मचे नाव | |
| | पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता | |
| | दुरध्वनी क्रमांक | |
| | ई मेल :- | |
| | व्हाटसअप् क्रमांक | |
| २ | निविदेसंबंधी चर्चा करणेसाठी अधिकृत व्यक्तीचे नाव :- | |
| | मोबाईल क्रमांक :- | |
| ३ | भागीदारांची नावे | |
| ४ | संस्थेचा बँक तपशिल (रद्द केलेल्या धनादेशाची छायांकित प्रत सोबत जोडावी) | |

स्थळ:-

दिनांक:- नांव, शिक्का व स्वाक्षरी

**प्रतिज्ञापत्र**

**प्रति,**

**मा.कार्यकारी अधिकारी,**
**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि.सोलापूर - ४१३३०४.**

**विषय :- विद्युत साहित्य पुरवठा करणेबाबत.**

**महोदय,**

**मी / आम्ही खाली सही करणार श्री./श्रीमती ---------------------------------------------------------------------- श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे विद्युत साहित्य पुरवठा करण्यासाठी जाहिर ई निविदेमधून श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या होणा-या दर मंजुरी आदेशान्वये अंतिम करण्यात येणा-या दराने पुरवठा करण्याची आमची / माझी तयारी आहे. दर स्विकृतीबाबत स्वाक्षरीत दरपत्रक सादर करत आहे / आहोत. सदर पुरवठा कामाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा ५० टक्के पर्यंत जास्त मालाची समितीतर्फे मागणी झाल्यास मी /आम्ही ती मंजूर दराने पुरविण्याची हमी देत आहे /आहोत. तसेच या संमतीपत्राद्वारे मी / आम्ही घोषित करत आहे / आहोत की, सोबत सदरचे दर पुरवठयासाठी जाहिर ई निविदेच्या सोबतच्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या आहेत. सदरच्या सर्व अटी व शर्ती आम्हांस मान्य असून त्या आमच्यावर बंधनकारक राहतील. जाहिर ई निविदेमध्ये देण्यात आलेली माहिती व कागदपत्रे सत्य असून बरोबर आहे.**

**तसेच** संस्थान/शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्था यांनी मला /माझ्या संस्थेला/फर्मला काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेले नाही. त्याबाबत माझेकडून हयगय झालेस किंवा काळ्या यादीत माझे नाव असल्याचे निदर्शनास आल्यास मी / आम्ही दंडनीय व कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

**स्थळ:-**

**दिनांक:-** **पुरवठाधारकाचे नांव, शिक्का व स्वाक्षरी**

## परिशिष्ट क्रमांक - ३

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र) ४१३३०४.**
**क्र. विद्युत विभाग/का.वि./ /२०२५**

## दरपत्रक

**नांव व पत्ता :**------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

| अ. क्र. | तपशिल | दर्जा | परिणाम | दर रू. जीएसटी सहीत व सर्व करासहीत | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी (रू.) | अक्षरी (रू.) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | २० वॅट एलईडी टयुब सेट | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| २ | ३ वॅट एलईडी बल्ब | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ३ | ९ वॅट एलईडी बल्ब | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ४ | १२ वॅट एलईडी बल्ब | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ५ | ९ वॅट एलईडी बल्ब इर्मजन्सी | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ६ | ६० वॅट फोकस | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ७ | १२० वॅट फोकस | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ८ | ६ ए स्विच मॉडयुलर | विनय | प्रती नग | | |
| ९ | ६ ए सॉकेट मॉडयुलर | विनय | प्रती नग | | |
| १० | ६ ए टॉप | विनय | प्रती नग | | |
| ११ | १६ ए टॉप | विनय | प्रती नग | | |
| १२ | १ एमएम २ कोर केबल | पॉलीकॅब | प्रती मीटर १०० | | |
| १३ | १.५ एमएम ३ कोर केबल | पॉलीकॅब | प्रती मीटर १०० | | |
| १४ | १ एमएम वायर | पॉलीकॅब | प्रती मीटर ९० | | |
| १५ | १.५ एमएम वायर | पॉलीकॅब | प्रती मीटर ९० | | |
| १६ | २.५ एमएम वायर | पॉलीकॅब | प्रती मीटर ९० | | |
| १७ | ४ एमएम वायर | पॉलीकॅब | प्रती मीटर ९० | | |
| १८ | सव्हिस वायर एमएम ४ | ॲकर/ पॉलीकॅब | प्रती मीटर | | |
| १९ | फॅन कंन्डेन्सर एमएफडी २.५ | ओरिएन्ट / क्राप्टन | प्रती नग | | |
| २० | फॅन डिमर | विनय | प्रती नग | | |
| २१ | १२०० एमएम सिलिंग फॅन | ओरिएन्ट / क्राप्टन | प्रती नग | | |
| २२ | केबल टाय एमएम ४००/३०० | उत्तम | प्रती पाकीट | | |
| २३ | २ पिन मेल फिमेल | विनय | प्रती नग | | |
| २४ | एमसीबी सिंगल पोल .ए ६/१६/१० | HPL/LT | प्रती नग | | |
| २५ | पेन्सील सेल. | Everyday | प्रती नग | | |
| २६ | ४० ए फोर पोल एमसीबी. | HPL/LT | प्रती नग | | |
| २७ | DSL लाईट १२ वॅट | सिस्का | प्रती नग | | |
| २८ | DSL लाईट ७ वॅट | सिस्का | प्रती नग | | |
| २९ | पंचम बोर्ड एम ६ | उत्तम प्रतीचे | प्रती नग | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | टेप इन्सुलेषन | उत्तम | प्रती नग | | |
| ३१ | पंचम बोर्ड एम १२ | उत्तम प्रतीचे | प्रती नग | | |
| ३२ | RDL १२ Wats | सिस्का | प्रती नग | | |
| ३३ | वॉल फॅन .इंची १८ | ओरिएन्ट / क्राप्टन | प्रती नग | | |
| ३४ | एलईडी टयुब सेट फुट २ | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ३५ | सीओबी लाईट वॅट१२ | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ३६ | ४५ वॅट एलईडी बल्ब | फिलीप्स / सिस्का | प्रती नग | | |
| ३७ | १६ ए स्विच मॉडयुलर | विनय | प्रती नग | | |
| ३८ | १६ ए सॉकेट मॉडयुलर | विनय | प्रती नग | | |
| ३९ | सव्हिस वायर एमएम ६ | ॲंकर/ पॉलीकॅब | प्रती मीटर | | |
| ४० | पेंडंट होल्डर | विनय/ ॲंकर | प्रती नग | | |
| ४१ | सव्हिस वायर एमएम १० | ॲंकर/ पॉलीकॅब | प्रती मीटर | | |
| ४२ | रावल प्लग | पीव्हीसी | प्रती नग | | |
| ४३ | २५×८ स्कुर बॉक्स | उत्तम | प्रती नग | | |
| ४४ | ४५ वॅट स्ट्रिट लाईट | सिस्का | प्रती नग | | |
| ४५ | ३५×८ स्कुर बॉक्स | उत्तम | प्रती नग | | |
| ४६ | ४५×८ स्कुर बॉक्स | उत्तम | प्रती नग | | |
| ४७ | ६०×८ स्कुर बॉक्स | उत्तम | प्रती नग | | |
| ४८ | ७५×८ स्कुर बॉक्स | उत्तम | प्रती नग | | |
| ४९ | फॅन कंन्डेन्सर एमएफडी ४ | ओरीयंट/ क्रॉम्प्टन | प्रती नग | | |
| ५० | २० एमएम पाईप | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५१ | २५ एमएम पाईप | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५२ | २० एमएम जॅक्षन | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५३ | २५ एमएम जॅक्षन | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५४ | २० एमएम बेंन्ड | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५५ | २५ एमएम बेंन्ड | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५६ | २० एमएम सॅडल | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५७ | २५ एमएम सॅडल | पीव्हीसी पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ५८ | केसिंग पट्टी. | मोदी | प्रती नग | | |
| ५९ | १४०० एमएम सिलिंग फॅन | ओरीयंट /क्रॉम्प्टन | प्रती नग | | |
| ६० | एक्झॉस्ट फॅन .इंची ९ | ओरीयंट /क्रॉम्प्टन | प्रती नग | | |
| ६१ | एक्झॉस्ट फॅन .इंची १२ | ओरीयंट /क्रॉम्प्टन | प्रती नग | | |
| ६२ | एक्झॉस्ट फॅन .इंची १८ | ओरीयंट /क्रॉम्प्टन | प्रती नग | | |
| ६३ | केबल टाय एमएम २००/१०० | उत्तम | प्रती पाकीट | | |
| ६४ | फॅक्सीबल पाईप | उत्तम | प्रती नग | | |
| ६५ | ॲंगल होल्डर | विनय/ | प्रती नग | | |
| ६६ | बॅटन होल्डर | विनय/ | प्रती नग | | |
| ६७ | ३२ ए एमसीबी डिपी. | HPL/LT | प्रती नग | | |
| ६८ | ६३ ए एमसीबी डिपी. | HPL/LT | प्रती नग | | |
| ६९ | एमसीबी बॉक्स पीव्हीसी२वे | HPL/LT | प्रती नग | | |
| ७० | एमसीबी बॉक्स मेटल वे १०/८/६/४/२ | HPL/LT | प्रती नग | | |
| ७१ | एमसीबी बॉक्स मेटल वे १६/१४/१२ | HPL/LT | प्रती नग | | |
| ७२ | २५ वॅट स्ट्रिट लाईट | सिस्का | प्रती नग | | |
| ७३ | ९० वॅट स्ट्रिट लाईट SSK BLG | सिस्का | प्रती नग | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७४ | ३२ ए फोर पोल एमसीबी. | HPL/LT | प्रती नग | | |
| ७५ | ६३ ए फोर पोल एमसीबी. | LT/ Ligrand | प्रती नग | | |
| ७६ | पंचम बोर्ड एम ४ | उत्तम प्रतीचे | प्रती नग | | |
| ७७ | पंचम बोर्ड एम ८ | उत्तम प्रतीचे | प्रती नग | | |
| ७८ | पंचम बोर्ड एम १८ | उत्तम प्रतीचे | प्रती नग | | |
| ७९ | वॉल फॅन .इंची १२ | क्राम्प्टन | प्रती नग | | |
| ८० | बसबार ३२A | पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ८१ | बसबार ६३A | पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ८२ | बसबार १००A | पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ८३ | बसबार २००A | पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ८४ | चेंजओव्हर १००A | पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ८५ | चेंजओव्हर २००A | पॉलीकॅंब | प्रती नग | | |
| ८६ | १०० ए फोर पोल एमसीबी. | LT/ Ligrand | प्रती नग | | |
| ८७ | १०० ए ३ पोल एमसीबी. | LT/ Ligrand | प्रती नग | | |
| ८८ | 32 अ/400 व्ही किटकॅट फ्युज | CRX | प्रती नग | | |
| ८९ | ६`` एक्झास फॅन पिविसि | क्रॉप्टन | प्रती नग | | |

**स्थळ:-**

**दिनांक :-** **नांव, शिक्का व स्वाक्षरी**